शनिवार दि. ०५ सप्टेंबर २०२६ ● जालना ● वर्ष ८ वे ● अंक ०५ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# हैदराबाद गॅझेटच्या नावाखाली मराठा समाजात संभ्रम निर्माण करू नका; विखे पाटलांचा राजीनामा घ्या

## डॉ. संजय लाखे-पाटील यांची मागणी; मराठा-कुणबी प्रमाणपत्रासाठी कायदेशीर प्रक्रिया पाळण्याचा आग्रह

**जालना - प्रतिनिधी**

हैदराबाद गॅझेटच्या नावाखाली मराठा समाजात संभ्रम निर्माण करण्याचे काम होऊ नये. केवळ जुन्या गॅझेटचा आधार घेऊन मराठा समाजातील प्रत्येक व्यक्तीला कुणबी प्रमाणपत्र मिळणार असल्याचे चित्र निर्माण करणे चुकीचे असून, जात प्रमाणपत्र देताना संविधान, कायदे आणि शासनाने निश्चित केलेली प्रक्रिया काटेकोरपणे पाळली पाहिजे, अशी भूमिका डॉ. संजय लाखे-पाटील यांनी मांडली. महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या भूमिकेमुळे या संपूर्ण विषयात संभ्रम निर्माण होत असल्याचा आरोप करत त्यांनी विखे पाटील यांच्या राजीनाम्याची मागणी केली. जालन्यात एका हॉटेलमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत डॉ. लाखे-पाटील बोलत होते. यावेळी शरद देशमुख, ज्ञानेश्वर कदम यांची उपस्थिती होती.

यावेळी डॉ लाखे पाटील यांनी हैदराबाद संस्थानातील जुन्या महसुली, शैक्षणिक, सनदी, करारनामे तसेच अन्य अधिकृत नोंदींच्या आधारे जात प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया असावी, असे स्पष्ट केले. संबंधित व्यक्तीची पूर्वापार नोंद, वंशावळ आणि त्या नोंदीशी असलेला जातनातेसंबंध अधिकृत कागदपत्रांच्या आधारे सिद्ध झाल्यानंतरच प्रमाणपत्र देण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली.

मराठा समाजातील प्रत्येक व्यक्ती कुणबी असल्याचा सरसकट दावा करता येणार नाही, असे डॉ. लाखे-पाटील यांनी स्पष्ट केले. ज्या व्यक्तींकडे पूर्वापार कुणबी असल्याच्या अधिकृत नोंदी उपलब्ध आहेत आणि ज्यांची वंशावळ त्या नोंदीशी कायदेशीररीत्या जोडली जाते, अशाच पात्र व्यक्तींना कुणबी अथवा मराठा-कुणबी प्रमाणपत्राचा लाभ मिळावा, अशी त्यांची भूमिका आहे.

हैदराबाद संस्थानाच्या काळातील महसुली नोंदी, शैक्षणिक दस्तऐवज, सनदी, करारनामे आणि अन्य अधिकृत अभिलेख तपासणे आवश्यक आहे. या नोंदींच्या आधारे संबंधित व्यक्तीची वंशावळ निश्चित करून जातनातेसंबंध सिद्ध झाल्यानंतरच प्रमाणपत्र देण्यात यावे. केवळ एखाद्या व्यक्तीच्या नोंदीवरून अथवा नातेसंबंधाचा दावा करण्यात आला म्हणून सरसकट प्रमाणपत्र देणे योग्य ठरणार नाही, असे त्यांनी सांगितले.

अशी प्रक्रिया न पाळता मोठ्या प्रमाणावर प्रमाणपत्रे देण्याचा प्रयत्न झाल्यास भविष्यात त्यातून प्रशासकीय तसेच न्यायालयीन गुंतागुंत निर्माण होण्याची शक्यता असल्याचा दावा त्यांनी केला.

मराठा समाजातील पात्र व्यक्तींना त्यांच्या उपलब्ध पुराव्यांच्या आधारे न्याय मिळाला पाहिजे, तसेच कुणबी समाजाच्या घटनात्मक अधिकारांचे संरक्षण झाले पाहिजे. मात्र या दोन्ही बाबींचा समतोल राखताना प्रशासनाने स्पष्ट आणि पारदर्शक प्रक्रिया अवलंबणे आवश्यक असल्याचे डॉ. लाखे-पाटील यांनी नमूद केले.

हैदराबाद गॅझेटचा संदर्भ देऊन प्रत्येक मराठा व्यक्तीला कुणबी प्रमाणपत्र मिळणार असल्याचा संदेश समाजात गेल्यास अनावश्यक संभ्रम आणि गैरसमज निर्माण होऊ शकतात. त्यामुळे शासनाने आपली भूमिका स्पष्टपणे जनतेसमोर मांडावी, अशी मागणी त्यांनी केली. त्याचबरोबर मराठा आणि कुणबी या संज्ञांबाबत सामाजिक पातळीवर अनावश्यक संघर्ष निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाने कोणत्याही निर्णयाची अंमलबजावणी करताना कायदेशीर चौकट आणि उपलब्ध पुरावे यांना केंद्रस्थानी ठेवावे, असे त्यांनी सांगितले.

न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीच्या कार्याचा उल्लेख करताना डॉ. लाखे-पाटील यांनी मराठवाड्यातील जुन्या नोंदी, वंशावळी आणि उपलब्ध पुराव्यांच्या आधारे प्रमाणपत्र मिळविण्याच्या प्रक्रियेला या समितीमुळे चालना मिळाल्याचा दावा केला.

त्यांच्या म्हणण्यानुसार, समितीच्या स्थापनेपूर्वी जुन्या अभिलेखांच्या आधारे जात प्रमाणपत्र मिळविण्याची प्रक्रिया अनेक नागरिकांसाठी मर्यादित स्वरूपाची होती. समितीच्या माध्यमातून जुन्या नोंदी शोधणे, त्यांची पडताळणी करणे आणि पात्रतेनुसार प्रमाणपत्र मिळविण्याची संधी अनेकांना उपलब्ध झाली.

तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समितीला आवश्यक प्रशासकीय आणि आर्थिक सहकार्य उपलब्ध करून दिल्याचा दावाही त्यांनी केला. शिंदे समितीच्या कार्यकाळातील विविध आकडेवारीचा संदर्भ देताना विविध प्रवर्ग आणि उपजातींच्या



### एकनाथ शिंदेंच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी जालन्यात भव्य समारंभ

प्रमाणपत्रांचा समावेश असल्याचे डॉ. लाखे-पाटील यांनी स्पष्ट केले. उपलब्ध आकडेवारीतील सर्व प्रमाणपत्रे केवळ मराठा समाजाशी संबंधित असल्याचा अर्थ काढणे चुकीचे असल्याचे त्यांनी सांगितले. कुणबी प्रवर्गातील विविध जाती व उपजातींच्या प्रमाणपत्रांचाही या आकडेवारीत समावेश असू शकतो. त्यामुळे प्रमाणपत्रांच्या संख्येचे विश्लेषण करताना संबंधित प्रवर्ग, जात आणि उपजात यांचा स्वतंत्र विचार करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

हैदराबाद गॅझेटच्या अंमलबजावणीच्या संदर्भात शासनाकडून करण्यात येणाऱ्या कार्यवाहीवर डॉ. लाखे-पाटील यांनी तीव्र आक्षेप घेतला. महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या भूमिकेमुळे जात प्रमाणपत्राच्या कायदेशीर प्रक्रियेबाबत संभ्रम निर्माण होत असल्याचा आरोप त्यांनी केला.

''कायद्यात आणि संविधानात जी प्रक्रिया निश्चित करण्यात आली आहे, त्याच प्रक्रियेने जात प्रमाणपत्र देण्यात यावे. त्या प्रक्रियेच्या बाहेर जाऊन कोणतीही प्रशासकीय सोय निर्माण केली तर ती न्यायालयीन कसोटीवर टिकणे कठीण होईल,'' असा दावा त्यांनी केला.

हैदराबाद गॅझेटच्या आधारे मराठा समाजातील प्रत्येक व्यक्तीला कुणबी प्रमाणपत्र मिळेल, असा प्रचार होत असल्यास शासनाने तो तातडीने स्पष्ट करावा. पात्र कुणबी व्यक्तींना त्यांचा घटनात्मक अधिकार मिळालाच पाहिजे; मात्र पुरावा नसताना सरसकट प्रमाणपत्र देण्यास आपला विरोध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**'विखे पाटलांनी राजीनामा द्यावा'**

हैदराबाद गॅझेटच्या अंमलबजावणीबाबत स्पष्ट कायदेशीर (पान २ वर)

## दुष्काळी सदृश परिस्थितीमुळे शिवचैतन्य दहीहंडी महोत्सव यंदा स्थगित

**जालना - प्रतिनिधी**

श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या निमित्ताने दरवर्षी उत्साहात आयोजित करण्यात येणारा शिवचैतन्य दहीहंडी महोत्सव यंदा दुष्काळ सदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर स्थगित करण्यात आला आहे. शिवचैतन्य प्रतिष्ठान, जालना यांच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या या दहीहंडी महोत्सवाची जालना शहरासह संपूर्ण जिल्ह्यात मोठी उत्सुकता असते. श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या निमित्ताने चंद्रशेखर आझाद मैदान, जालना येथे भव्य स्वरूपात शिवचैतन्य दहीहंडी महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. जालना शहरातील मानाच्या दहीहंडींमध्ये या दहीहंडीचा विशेष नावलौकिक असून, यंदाचे हे पाचवे वर्ष आहे. मात्र, सध्या निर्माण झालेल्या दुष्काळ सदृश परिस्थितीचा विचार करून यंदाचा कार्यक्रम आयोजित न करण्याचा निर्णय शिवचैतन्य प्रतिष्ठानच्या वतीने घेण्यात आला आहे. दरवर्षी या महोत्सवात दहीहंडी स्पर्धेसोबतच ढोल पथकांच्या स्पर्धेचेही आयोजन करण्यात येते या महोत्सवात मुंबई, ठाणे सह महाराष्ट्रातील विविध शहरातून गोविंदा पथके सहभागी होत असतात. त्यामुळे या दहीहंडी महोत्सवाला (पान २ वर)

## जालना जिल्ह्यात कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी जात प्रमाणपत्रासाठी विशेष शिबिरांचे आयोजन

### जिल्ह्यातील ६२ महसूल मंडळांमध्ये १०, ११,१२, १५, १६ सप्टेंबर रोजी शिबिरांचे आयोजन

**जालना प्रतिनिधी**

कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी जात प्रमाणपत्रासाठी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने जालना जिल्ह्यात १० ते १७ सप्टेंबर, २०२६ या कालावधीत मंडळनिहाय विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील आठही तालुक्यांमध्ये एकूण ६२ शिबिरांचे नियोजन करण्यात आले आहे. यामध्ये जालना तालुक्यात १० शिबिर तर बदनापूर मध्ये ६, अंबड मध्ये ९, घनसावंगी मध्ये ८, परतूर मध्ये ६, मंठा मध्ये ६, भोकरदन मध्ये ११ आणि जाफराबाद मध्ये ६ असे एकूण ६२ शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील ८ तालुक्यांमधील ६२ महसूल मंडळांमध्ये दि.१०, ११, १२, १५ व १६ सप्टेंबर २०२६ रोजी या शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे.

यामध्ये १० सप्टेंबर, २०२६ रोजी जालना तालूक्यातील देवमुर्ती आणि सांगवी तलाव या मंडळात तर बदनापुर तालूक्यातील बदनापुर, अंबड तालुक्यातील अंबड, घनसावंगी तालुक्यातील कुंभारपिंपळगाव आणि राणी उंचेगाव, परतुर तालुक्यातील आष्टी, मंठा तालुक्यातील पांगरी गोसावी, भोकरदन तालुक्यातील आन्वा, दानापुर, पिंपळगाव रेणुकाई आणि जाफ्राबाद तालुक्यातील माहोरा येथे शिबिरे होणार आहेत. तसेच ११ सप्टेंबर, २०२६ रोजी जालना तालूक्यातील नेर आणि शेवली या मंडळात तर बदनापुर तालूक्यातील बावणे पांगरी, अंबड तालुक्यातील शहागड आणि वडीगोद्री, घनसावंगी तालुक्यातील रांजणी आणि पानेवाडी, परतुर तालुक्यातील श्रीष्टी, मंठा तालुक्यातील तळणी ढोकसाळ, भोकरदन तालुक्यातील धावडा, भोकरदन आणि जाफ्राबाद तालुक्यातील कोळेगाव येथे शिबिरे होणार आहेत. १२ सप्टेंबर, २०२६ रोजी जालना तालूक्यातील वाघुळ जहागीर आणि गोलापांगरी (पान २ वर)

## कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा प्रमाणपत्रासाठी जालना जिल्ह्यात नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती

**जालना - प्रतिनिधी**

जिल्ह्यातील पात्र नागरिकांना कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा जात प्रमाणपत्र तसेच जात पडताळणी प्रमाणपत्र मिळण्यास येणाऱ्या अडचणींचे निराकरण करून ही प्रक्रिया गतिमान व पारदर्शक करण्यासाठी जालना जिल्ह्यात नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली आहे. राज्याचे जलसंपदा मंत्री तथा मराठा आरक्षण मंडळ उपसमितीचे अध्यक्ष यांच्या निर्देशानुसार उपजिल्हाधिकारी (निवडणूक शाखा) शिरीष यादव यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांचा मोबाईल क्रमांक ९५४५४ ५१००५ असा आहे. नोडल अधिकारी यांच्यावर कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा जात प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्र मिळविताना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करून प्रक्रिया गतिमान व पारदर्शक करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. जात प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्रासंदर्भातील प्राप्त तक्रारींची दररोज आढावा बैठक (पान २ वर)

## जालना जिल्ह्यातील पाच शिक्षकांची जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवड

**जालना - प्रतिनिधी**

शिक्षक क्षेत्रात उत्कृष्ट व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांचा गौरव करण्याच्या उद्देशाने दरवर्षी शिक्षक दिनाच्या पार्श्वभूमीवर प्रदान करण्यात येणाऱ्या जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी जालना जिल्ह्यातील पाच शिक्षकांची निवड करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेचे येथे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्ण कांत कनवारीया यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत जिल्हा निवड समितीने प्राप्त ३० शिक्षकांच्या प्रस्तावांची छाननी करून सन २०२६ च्या जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी पाच शिक्षकांची निवड करण्यात आली आहे. ग्राम विकास व जलसंधारण विभागाच्या शासन परिपत्रक दिनांक १२ डिसेंबर २००० अन्वये शिक्षक क्षेत्रात उत्कृष्ट, उल्लेखनीय आणि गुणवत्तापूर्ण कार्य करणाऱ्या शिक्षकांना दरवर्षी जिल्हा शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. त्यानुसार यंदाच्या पुरस्कारासाठी जिल्ह्यातील पात्र शिक्षकांचे प्रस्ताव मागविण्यात आले होते. प्राप्त प्रस्तावांमधून जिल्हा निवड समितीने विविध निकषांच्या आधारे पाच शिक्षकांची पुरस्कारासाठी निवड केली आहे. जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवड झालेल्या शिक्षकांमध्ये श्री. कैलास मधुकर चौथे, प्राथमिक शिक्षक, जि. प. प्राथमिक शाळा, देवगाव म.कें., गेवराई बाजार, ता. बदनापूर, श्री. सचिन रामदास खिल्लारे, सहशिक्षक, जि. प. प्राथमिक शाळा, लालवाडी तांडा, ता. अंबड, श्री. विजय बाबाराव कांगणे, प्राथमिक पदवीधर शिक्षक, जि. प. उच्च प्राथमिक शाळा, दुधा, ता. मंठा, श्री. पेन्टू विठ्ठल मैसनवाड, सहशिक्षक, जि. प. प्राथमिक शाळा, दहिफळ भो., पूर्व, ता. परतूर तसेच डॉ. दत्तात्रय मनोहर सपकाळ, माध्यमिक शिक्षक, जि. प. प्रशाला, धावडा, ता. भोकरदन, यांचा समावेश आहे.

शिक्षण क्षेत्रात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी केलेले (पान २ वर)

## सराईत गुन्हेगार पारस नंदवर एमपीडीए अंतर्गत स्थानबद्धतेची कारवाई

**जालना - प्रतिनिधी**

शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याच्या आणि गुन्हेगारी कारवायांना आळा घालण्याच्या उद्देशाने जिल्हा प्रशासनाने मोठी कारवाई केली आहे. अवैध धंदे आणि गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या पारस लालमन यादव नंद याच्यावर एमपीडीए ( - महाराष्ट्र विघातक कृत्य प्रतिबंधक कायदा) अंतर्गत स्थानबद्धतेची कारवाई करण्यात आली आहे. सदर बाजार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप भारती यांनी या कारवाईची माहिती दिली. जिल्हाधिकारी, जालना यांच्या अधिकृत आदेशानुसार ही कठोर कार्रवाई पूर्ण करण्यात आली असून, आरोपी पारस नंद याला स्थानबद्ध करण्यात आले आहे. गेल्या काही काळापासून या भागात सक्रिय असलेल्या गुन्हेगारी घटकांवर वचक निर्माण करण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून सातत्याने पावले उचलली जात आहेत. या कारवाईमुळे गुन्हेगारी वर्तुळात एकच खळबळ उडाली असून, नागरिकांमधून पोलिसांच्या या भूमिकेचे स्वागत होत आहे. आगामी काळातही अवैध धंदे व गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांवर अशाचप्रकारची कठोर कायदेशीर कारवाई तीव्र केली जाईल, असा इशारा पोलीस प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

## शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज करण्यासाठी ३० ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ

**जालना -प्रतिनिधी**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अधिपत्याखालील शासकीय वसतिगृहांमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची सूचना देण्यात आली आहे.

शासकीय वसतिगृहातील इयत्ता ११ वी, इयत्ता १२ वी तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेण्यासाठी अर्ज करण्यासाठी ३० ऑक्टोबर, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. स्वाधार योजनेच्या लाभासाठी वसतिगृह प्रवेशाचा अर्ज आवश्यक

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांनी शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज करणे आवश्यक आहे. स्वाधार योजनेसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांनी शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी विहित मुदतीत अर्ज करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज न केलेल्या विद्यार्थ्यांना स्वाधार योजनेचा लाभ मिळणार नाही. त्यामुळे संबंधित विद्यार्थ्यांनी याची गांभीर्याने नोंद घेऊन ३० ऑक्टोबर, २०२६ पूर्वी वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज सादर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

जालना जिल्ह्यातील इयत्ता ११ वी, १२ वी तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमात शिक्षण घेणाऱ्या सर्व पात्र विद्यार्थ्यांनी या मुदतवाढीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, जालना यांच्या मार्फत करण्यात आले आहे. उपस्थित होते.

# संपादकीय...

## १०० कोटींचे लक्ष्य छान; पण जालन्याला मिळणार काय?

कर मूल्यनिर्धारणातून महापालिकेचे उत्पन्न वाढविण्याचा निर्धार स्वागतार्ह; मात्र वाढीव करभाराच्या बदल्यात नागरिकांना दर्जेदार सेवा मिळणार का? जालना महापालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीत शहराच्या आर्थिक भवितव्याशी संबंधित काही महत्त्वाचे मुद्दे पुढे आले आहेत. मालमत्तांचे कर मूल्यनिर्धारण पूर्ण करून महापालिकेचे उत्पन्न सुमारे १०० कोटी रुपयांपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट, स्वच्छता निविदा तीन दिवसांत पूर्ण करण्याचे निर्देश, सणासुदीच्या काळात फॉगिंग, मागील काळातील बी.ओ.टी. प्रस्तावांचा आढावा आणि प्रगती अहवाल न देणाऱ्या अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाईचा इशाराया सर्व निर्णयांकडे केवळ बैठकीतील ठराव म्हणून न पाहता शहराच्या प्रशासनातील बदलाची सुरुवात म्हणून पाहणे गरजेचे आहे. मात्र या निर्णयांबरोबरच काही मूलभूत प्रश्न उपस्थित होतात. महापालिकेचे उत्पन्न वाढणार असेल तर नागरिकांना त्याच्या बदल्यात मिळणार काय? कर वाढला किंवा करआकारणीचा विस्तार झाला, पण रस्ते खड्डेमुक्त झाले नाहीत, कचरा वेळेवर उचलला गेला नाही, पाणीपुरवठा सुरळीत झाला नाही, नाले स्वच्छ झाले नाहीत आणि पथदिवे बंदच राहिले तर वाढीव उत्पन्नाचा अर्थ काय? महापालिकेच्या तिजोरीत पैसा जमा होणे आवश्यक आहेच; पण त्या पैशाचे रूपांतर दर्जेदार नागरी सुविधांमध्ये होणे त्याहून महत्त्वाचे आहे. शहरातील सुमारे सहा हजार मालमत्तांचे सर्वेक्षण पूर्ण झाल्याचे सांगण्यात आले असून सहा टीममार्फत सर्वेक्षण सुरू आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर महापालिकेच्या उत्पन्नात मोठी वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. १०० कोटींचे उद्दिष्ट निश्चितच महत्त्वाकांक्षी आहे पण या उद्दिष्टामागचे गणित नागरिकांसमोर स्पष्ट झाले पाहिजे. शहरातील एकूण करपात्र मालमत्ता किती? सध्या किती मालमत्तांकडून कर वसूल केला जातो किती मालमत्ता करजाळ्याबाहेर आहेत सध्याची मालमत्ता कराची एकूण मागणी किती? प्रत्यक्ष वसुली किती? थकबाकी किती? नव्या मूल्यनिर्धारणानंतर करआकारणीमध्ये किती वाढ अपेक्षित आहे? आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे १०० कोटींचे उत्पन्न कोणत्या कालावधीत साध्य करण्याचे नियोजन आहे? या प्रश्नांची उत्तरे उपलब्ध झाली तरच १०० कोटींचे लक्ष्य हे वास्तववादी आर्थिक आराखडा आहे की केवळ बैठकीतील आकडा, हे स्पष्ट होईल. मालमत्तांचे अचूक सर्वेक्षण आणि योग्य कर मूल्यनिर्धारण हे महापालिकेच्या आर्थिक स्वावलंबनासाठी आवश्यक आहे. करचोरी किंवा करजाळ्याबाहेर असलेल्या मालमत्तांना कराच्या कक्षेत आणणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. मात्र या प्रक्रियेत सामान्य करदात्यावर अन्याय होता कामा नये. एखाद्या मालमत्तेचे चुकीचे मूल्यनिर्धारण झाले, क्षेत्रफळ चुकीचे नोंदविले गेले किंवा वापराचा प्रकार चुकीचा नमूद झाला तर करदात्याला अनावश्यक आर्थिक भार सहन करावा लागू शकतो. त्यामुळे सर्वेक्षण प्रक्रियेत पारदर्शकता, डिजिटल नोंद, हरकतीची संधी आणि तक्रार निवारणाची प्रभावी यंत्रणा असणे गरजेचे आहे. महापालिकेने नागरिकांना केवळ 'कर भरा' असे सांगण्यापेक्षा 'तुमच्या मालमत्तेचे मूल्यनिर्धारण असे झाले आहे आणि त्यामागची कारणे ही आहेत' हे स्पष्ट करण्याची पद्धत स्वीकारली पाहिजे. महापालिकेच्या उत्पन्नवाढीसाठी कर वसुली कडक करणे आवश्यक आहे. मात्र त्याचवेळी करदात्याचा महापालिकेवरील विश्वास वाढविणेही आवश्यक आहे. नागरिकांच्या मनात एक साधा प्रश्न असतो. ''मी कर भरतो; त्याचा उपयोग कुठे होतो?'' या प्रश्नाचे उत्तर रस्त्यावर दिसले पाहिजे. स्वच्छ रस्ते, नियमित कचरा संकलन, पुरेशी पथदिव्यांची व्यवस्था, सक्षम नाले, चांगली उद्याने, सुरक्षित सार्वजनिक जागा आणि कार्यक्षम पाणीपुरवठा या सुविधा करदात्याला प्रत्यक्ष जाणवल्या पाहिजेत. महापालिकेचे उत्पन्न वाढविण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे नागरिकांमध्ये 'कर भरल्यास सेवा मिळते' हा विश्वास निर्माण करणे. शहराच्या स्वच्छतेशी संबंधित निविदा प्रक्रिया तीन दिवसांत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. हा आदेश स्वागतार्ह आहे. परंतु याच आदेशातून दुसरा प्रश्न निर्माण होतो. निविदा प्रक्रिया इतकी तातडीची होती तर ती यापूर्वी पूर्ण का झाली नाही? स्वच्छता ही कोणत्याही शहराची मूलभूत गरज आहे. कचरा संकलन, रस्ते सफाई, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापन यामध्ये खंड पडल्यास त्याचा थेट परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होतो. सणासुदीच्या काळात तर शहरात कचऱ्याचे प्रमाण वाढते. त्यामुळे निविदा प्रक्रियेला आता गती देणे आवश्यक असले तरी त्यानंतर नियुक्त होणाऱ्या यंत्रणेचे काम, मनुष्यबळ, वाहनांची संख्या, क्षेत्रनिहाय जबाबदारी आणि निरीक्षण व्यवस्था याबाबतही स्पष्टता असणे आवश्यक आहे. फक्त निविदा काढणे म्हणजे स्वच्छता होणे नाही. गणेशोत्सव, नवरात्रोत्सव आणि दिवाळीच्या पार्श्वभूमीवर फॉगिंग करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. डासांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी फॉगिंग हा एक उपाय आहे; पण तो सर्व समस्यांचे उत्तर नाही. पाणी साचणारी ठिकाणे, नाले, गटारे, कचऱ्याचे ढीग आणि अस्वच्छ परिसर कायम राहिले तर केवळ धूर फवारणी करून डासांचा प्रश्न सुटणार नाही. महापालिकेने त्यामुळे फॉगिंग + पाणी साचणाऱ्या ठिकाणांचे निर्मूलन + नालेसफाई + कचरा व्यवस्थापन + जनजागृती असा एकात्मिक आरोग्य आराखडा तयार करणे आवश्यक आहे. फॉगिंग कुठे झाले, किती क्षेत्रात झाले आणि किती वेळा झाले, याची नोंदही सार्वजनिक केल्यास नागरिकांचा विश्वास वाढेल. मागील नगरपालिका काळातील बी.ओ.टी. प्रस्तावांचा सविस्तर अहवाल मागविण्याचा निर्णय महत्त्वाचा आहे.

दैनिक युवा आदर्श दि. ०५-०९-२०२६

**CHANGE/CORRECTION IN NAME**
I HAVE A CHANGE IN MY NAME
FROM
OLD NAME
**SWARAJ SHALIGRAM SALVE**
NEW NAME
**SWARAJ SHALIKRAM SALVE**
AS PER MY DOCUMENTS
ADDRESS : WARUD BK, TQ. JAFRABAD
DIST. JALNA, 431206
MAHARASHTRA

# राखीच्या धाग्यातून जपले नाते, हेल्मेटच्या भेटीतून दिली सुरक्षिततेची हमी!

## चंदनझिरा पोलीस ठाण्यात रक्षाबंधनाचा अनोखा उपक्रम; कर्तव्याच्या धावपळीतही जपला स्नेहाचा धागा

**जालना । प्रतिनिधी**

नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी दिवस-रात्र कर्तव्य बजावणाऱ्या पोलीस दलातील अधिकारी व अंमलदारांमध्येही स्नेह, आपुलकी आणि बहीण-भावाचे नाते जपणारा रक्षाबंधनाचा सण चंदनझिरा पोलीस ठाण्यात उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात साजरा करण्यात आला. विशेष म्हणजे, यंदाच्या रक्षाबंधनाला केवळ राखी बांधण्यापुरते मर्यादित न ठेवता महिला पोलीस अधिकारी व अंमलदारांच्या सुरक्षिततेचा विचार करून त्यांना हेल्मेट भेट देण्याचा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. त्यामुळे ''राखीच्या धाग्याने नाते जपले आणि हेल्मेटच्या माध्यमातून सुरक्षिततेची हमी दिली'', असा आगळावेगळा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

चंदनझिरा पोलीस ठाण्यातील १३ महिला पोलीस अधिकारी व अंमलदारांनी पोलीस ठाण्यातील अधिकारी व अंमलदारांना राखी बांधून रक्षाबंधन साजरे केले. कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी, विविध बंदोबस्त, गुन्हे तपास, नागरिकांच्या तक्रारी आणि दैनंदिन पोलीस कामकाज अशा विविध जबाबदाऱ्यांमध्ये व्यस्त असतानाही पोलिसांनी वेळ काढून हा स्नेहपूर्ण उपक्रम साजरा केला.

**राखी बांधली अन् सुरक्षिततेची जबाबदारीही घेतली**

रक्षाबंधन म्हणजे केवळ भावाच्या हातावर राखी बांधण्याची परंपरा नव्हे, तर एकमेकांच्या सुख-दुःखात साथ देण्याची आणि सुरक्षिततेची काळजी घेण्याची भावना आहे. याच भावनेला सामाजिक बांधिलकीची जोड देत चंदनझिरा पोलीस ठाण्यात महिला पोलीस अंमलदारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न केंद्रस्थानी ठेवण्यात आला. पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांच्या संकल्पनेतून महिला पोलीस अधिकारी व अंमलदारांना हेल्मेट भेट देण्यात आले. कर्तव्याच्या ठिकाणी ये-जा करताना



दुचाकीवरून प्रवास करणाऱ्या महिला पोलीस कर्मचाऱ्यांना रस्ते अपघाताचा धोका संभवतो. त्यामुळे त्यांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी हेल्मेटचा वापर हा अत्यंत महत्त्वाचा असल्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

रक्षाबंधनाच्या दिवशी बहिणीकडून राखी बांधून घेताना तिच्या सुरक्षिततेची जबाबदारी स्वीकारण्याची भावना असते. याच भावनेतून महिला अंमलदारांच्या हातावर राखी बांधण्यासोबतच त्यांच्या सुरक्षित प्रवासासाठी हेल्मेट देण्यात आले. त्यामुळे या उपक्रमाने रक्षाबंधनाच्या पारंपरिक भावनेला आधुनिक सुरक्षिततेची जोड दिली.

**पोलीस अधीक्षकांच्या आवाहनाला प्रतिसाद**

जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधु यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात रस्ते अपघात रोखण्यासाठी विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. सिग्नल बसविणे, सूचना फलक लावणे, अपघातप्रवण ठिकाणे अर्थात ब्लॅक स्पॉट निश्चित करणे, क्रिटिकल कॉरिडॉरच्या माध्यमातून आवश्यक उपाययोजना करणे, ड्रंक ॲण्ड ड्राइव्हविरोधात कारवाई करणे यासह विविध उपक्रमांवर भर देण्यात येत आहे. रस्ते अपघात रोखण्यासाठी जनजागृतीबरोबरच स्वतःच्या पोलीस दलातील अधिकारी व अंमलदारांची सुरक्षितता देखील तितकीच महत्त्वाची आहे. याच दृष्टिकोनातून चंदनझिरा पोलीस ठाण्याने रक्षाबंधनाच्या कार्यक्रमाला सुरक्षिततेची जोड दिली.

**यापूर्वी कर्तव्य बजावताना झाले अपघात**

कर्तव्य बजावत असताना पोलीस अधिकारी व अंमलदारांना अनेकदा रस्त्यावरून प्रवास करावा लागतो. बंदोबस्त, तपास, गस्त, आपत्कालीन परिस्थिती किंवा अन्य शासकीय कामांसाठी दुचाकी अथवा अन्य वाहनाने प्रवास करताना अपघाताचा धोका कायम असतो.

यापूर्वी कर्तव्यावर असताना रस्ते अपघातात महिला अंमलदार सुनिता डोभाळ तसेच अंमलदार नितीन मतकर यांना प्राणघातक अपघाताला सामोरे जावे लागले असून त्यात जीवितहानी झाली आहे. अशा दुर्दैवी घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी पोलीस दलातील प्रत्येक कर्मचाऱ्याने वाहतूक नियमांचे पालन करणे, दुचाकी चालविताना हेल्मेट वापरणे आणि सुरक्षित प्रवासाला प्राधान्य देणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर रक्षाबंधनाच्या कार्यक्रमातून महिला पोलीस कर्मचाऱ्यांना हेल्मेट देणे हा केवळ भेटवस्तू देण्याचा उपक्रम नसून पोलीस दलातील कर्मचाऱ्यांच्या जीविताच्या सुरक्षेला प्राधान्य देणारा संदेश ठरला.

**सणाच्या दिवशीही कर्तव्यावर पोलीस**

सामान्य नागरिकांसाठी रक्षाबंधन हा कुटुंबीयांसोबत आनंद साजरा करण्याचा सण असतो. मात्र, सण-उत्सवाच्या काळात नागरिकांची सुरक्षितता अबाधित राहावी, कायदा व सुव्यवस्था सुरळीत राहावी आणि कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी पोलीस अधिकारी व अंमलदारांना कर्तव्यावर तैनात राहावे लागते.

दिवस असो अथवा रात्र, सण असो अथवा उत्सव, आपत्कालीन परिस्थिती असो अथवा कायदा-सुव्यवस्थेचे आव्हानपोलीस दलाचे कर्तव्य वेळेच्या चौकटीत बांधलेले नसते. अशा परिस्थितीत एकत्र काम करणाऱ्या अधिकारी व अंमलदारांमध्ये निर्माण होणारे आपुलकीचे आणि कुटुंबवत्सल नाते अनेकदा त्यांच्या कार्यक्षमतेला बळ देते. चंदनझिरा पोलीस ठाण्यातील रक्षाबंधनाचा कार्यक्रम याच मानवी नात्याचा सुंदर प्रत्यय देणारा ठरला.

**स्नेह, कर्तव्यनिष्ठा आणि सुरक्षिततेचा संगम**

रक्षाबंधनाच्या निमित्ताने महिला पोलीस अधिकारी व अंमलदारांनी सहकाऱ्यांना राखी बांधून स्नेह व्यक्त केला. त्याच वेळी महिला कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा विचार करून हेल्मेट भेट देण्यात आले. त्यामुळे एका बाजूला बहीण-भावाच्या नात्यातील जिव्हाळा जपला गेला, तर दुसऱ्या बाजूला रस्ते सुरक्षेबाबत जनजागृतीचा संदेशही देण्यात आला. ''राखीच्या धाग्यातून नाते जपायचे आणि हेल्मेटच्या माध्यमातून जीवन सुरक्षित ठेवायचे,'' ही संकल्पना या उपक्रमाची प्रमुख वैशिष्ट्य ठरली. पोलीस दलातील अधिकारी व अंमलदारांमध्ये परस्पर स्नेह, विश्वास आणि सामाजिक बांधिलकी वाढविण्यासोबतच महिला कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न या माध्यमातून करण्यात आला. चंदनझिरा पोलीस ठाण्यातील हा उपक्रम पोलीस दलातील कर्तव्यनिष्ठेला मानवी संवेदनशीलतेची जोड देणारा ठरला असून, रक्षाबंधनाच्या सणाचा सामाजिक आणि सुरक्षिततेचा संदेश अधिक व्यापक पातळीवर पोहोचविणारा उपक्रम म्हणून त्याकडे पाहिले जात आहे.

## पान १ व ४ वरुन...

### हैदराबाद गॅझेटच्या...

व घटनात्मक भूमिका मांडण्याऐवजी संभ्रम निर्माण करणारी भूमिका घेतल्याचा आरोप करत डॉ. संजय लाखे-पाटील यांनी महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या राजीनाम्याची मागणी केली.

शासनाने या प्रश्नावर स्पष्ट धोरण जाहीर करावे. जात प्रमाणपत्राच्या प्रक्रियेत पारदर्शकता आणावी आणि कोणत्याही समाजाच्या घटनात्मक अधिकारांवर परिणाम होणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशी मागणीही त्यांनी केली.मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर चुकीची माहिती किंवा संभ्रम निर्माण करणाऱ्या निर्णयांविरोधात आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

**एकनाथ शिंदेंच्या कार्याबद्दल जालन्यात कृतज्ञता समारंभ**

मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतलेल्या निर्णयांमुळे मराठवाड्यातील अनेक पात्र नागरिकांना जात प्रमाणपत्र मिळण्याचा मार्ग खुला झाल्याचा दावा डॉ. लाखे-पाटील यांनी केला. त्यामुळे शिंदे यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी जालन्यात विशेष कृतज्ञता समारंभ आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

''समाजासाठी ज्यांनी काम केले, त्यांच्याबद्दल कृतज्ञ राहणे ही सामाजिक बांधिलकी आहे,'' अशी भूमिका त्यांनी मांडली. या कार्यक्रमासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार यांच्यासह विविध राष्ट्रीय नेत्यांना निमंत्रित करण्याचा प्रयत्न करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच मराठा सेवा संघ, छावा यांसह विविध सामाजिक संघटनांमध्ये कार्यरत असलेल्या कार्यकर्त्यांचाही या कार्यक्रमात सत्कार करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. मराठा समाजाची चळवळ कोणत्याही एका व्यक्तीच्या नेतृत्वावर किंवा आदेशावर अवलंबून राहता कामा नये, अशी भूमिका डॉ. लाखे-पाटील यांनी मांडली. विविध राजकीय पक्षांमध्ये कार्यरत असलेल्या मराठा समाजातील कार्यकर्त्यांनी समाजाच्या प्रश्नांवर एकत्रितपणे भूमिका घेतली पाहिजे, असे त्यांनी सांगितले. मनोज जरांगे यांच्या आंदोलनातील काही भूमिकांवर त्यांनी टीका केली. मात्र मराठा समाजाच्या प्रश्नावर काम करणाऱ्या विविध घटकांनी परस्परांमध्ये संवाद ठेवून सामूहिक भूमिका घेण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले. एकनाथ शिंदे यांच्याबाबत वैयक्तिक टीका अथवा अपमानास्पद वक्तव्ये केली जात असल्यास त्याला विरोध केला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

जात प्रमाणपत्र आणि जात वैधता प्रमाणपत्र देताना संविधान, संबंधित कायदे, शासन निर्णय आणि न्यायालयाने निश्चित केलेली प्रक्रिया काटेकोरपणे पाळली पाहिजे. कायदेशीर प्रक्रियेबाहेर जाऊन घेतलेले निर्णय भविष्यात न्यायालयीन आव्हानास सामोरे जाऊ शकतात, असा दावा डॉ. लाखे-पाटील यांनी केला.

मराठा समाजातील पात्र व्यक्तींना त्यांच्या उपलब्ध पुराव्यांच्या आधारे न्याय मिळावा, कुणबी समाजाच्या घटनात्मक अधिकारांचे संरक्षण व्हावे आणि या प्रश्नामुळे दोन्ही समाजांमध्ये अनावश्यक संघर्ष निर्माण होऊ नये, यासाठी शासनाने स्पष्ट, पारदर्शक आणि कायदेशीर भूमिका जाहीर करावी, अशी मागणी त्यांनी केली.

हैदराबाद गॅझेटच्या संदर्भात निर्माण झालेला संभ्रम दूर करून पात्रता, पुरावे आणि वंशावळ यांच्या आधारे प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया स्पष्ट करणे ही शासनाची जबाबदारी आहे. अन्यथा या संवेदनशील विषयावर सामाजिक आणि राजकीय वातावरण अधिक तापण्याची शक्यता असून, शासनाच्या प्रत्येक निर्णयाकडे आता मराठा तसेच कुणबी समाजाचे लक्ष लागले आहे.

### दुष्काळी सदृश...

जालना शहरात मोठी गर्दी होत असते.

सध्याची दुष्काळ सदृश परिस्थिती आणि त्यातून निर्माण झालेले संकट इत्यादी अडचण लक्षात घेता शिवचैतन्य प्रतिष्ठानने यंदाचा शिवचैतन्य दहीहंडी महोत्सव रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे यावर्षी चा दहीहंडी कार्यक्रम रद्द करण्यात आला आहे.

सदरील दहीहंडी उत्सव रद्द करण्यात आल्याची सर्व कृष्णभक्त, गोविंदा पथके, दहीहंडीप्रेमी तसेच प्रतिष्ठानच्या सर्व सदस्यांनी याची नोंद घ्यावी असे आवाहन शिवचैतन्य प्रतिष्ठान च्या वतीने करण्यात येत आहे.

### जालना जिल्ह्यात...

या मंडळात तर बदनापुर तालूक्यातील रोशनगाव आणि शेलगाव, अंबड तालुक्यातील ताडहदगाव आणि गोंदी, घनसावंगी तालुक्यातील अंतरवाली टेंभी आणि जांब समर्थ, परतुर तालुक्यातील वाटुर, मंठा तालुक्यातील मंठा, भोकरदन तालुक्यातील राजुर, जानेफळ दाभाडी आणि जाफ्राबाद तालुक्यातील टेंभुर्णी येथे शिबिरे होणार आहेत. १५ सप्टेंबर, २०२६ रोजी जालना तालूक्यातील रामनगर, विरेगाव, जालना या मंडळात तर बदनापुर तालूक्यातील चिखली, अंबड तालुक्यातील सुखापुरी, रोहिलागड, घनसावंगी तालुक्यातील तिर्थपुरी, परतुर तालुक्यातील सातोना खुर्द, कोकाटे हदगाव मंठा तालुक्यातील माळतोंडी, भोकरदन तालुक्यातील हसनाबाद, आव्हाना आणि जाफ्राबाद तालुक्यातील जाफ्राबाद येथे शिबिरे होणार आहेत. तसेच १६ सप्टेंबर, २०२६ रोजी जालना तालूक्यातील पाचनवडगाव या मंडळात तर बदनापुर तालूक्यातील दाभाडी, अंबड तालुक्यातील जामखेड, धनगरपिंप्री, घनसावंगी तालुक्यातील घनसावंगी, परतुर तालुक्यातील परतुर मंठा तालुक्यातील जयपुर, भोकरदन तालुक्यातील केदारखेडा, सिपोरा बाजार आणि जाफ्राबाद तालुक्यातील कुंभारझरी, वरुड बु. या मंडळात शिबिरे होणार आहेत.

या शिबिरांमध्ये नागरिकांना कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी जात प्रमाणपत्र मिळविण्यासाठी आवश्यक असलेल्या नोंदी शोधणे, पुराव्यांची पडताळणी करणे, अर्ज स्वीकारणे आणि पात्र लाभार्थ्यांना प्रमाणपत्र वितरित करण्याची कार्यवाही करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी यांनी आदेशान्वये कळविले आहे.

### कुणबी, मराठा...

घेऊन संबंधित प्रकरणांवर आवश्यक कार्यवाही करणे, तसेच तहसीलदार, उपविभागीय अधिकारी व जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या कार्यालयांमध्ये आवश्यक समन्वय साधून प्रकरणांचा तातडीने निपटारा करण्यासाठी कार्यवाही करणे, अशीही जबाबदारी नोडल अधिकाऱ्यांवर आहे. याशिवाय जात प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्रासंदर्भातील प्रलंबित प्रकरणांचा अद्ययावत अहवाल दर सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करणे, नागरिकांना प्रमाणपत्र मिळविण्यास अनावश्यक विलंब होणार नाही याची दक्षता घेणे आणि आवश्यकतेनुसार संबंधित कार्यालयांना निर्देश देणे, तसेच आवश्यकतेनुसार संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या बैठका घेऊन प्रकरणांचा आढावा घेणे, या जबाबदाऱ्यांचाही समावेश असल्याचे जिल्हाधिकारी यांनी आदेशान्वये कळविले आहे.

### जालना जिल्ह्यातील...

प्रयत्न, शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी राबविलेले उपक्रम, नावीन्यपूर्ण शैक्षणिक प्रयोग तसेच समाजाभिमुख आणि उल्लेखनीय शैक्षणिक कार्याची दखल घेऊन शिक्षकांची पुरस्कारासाठी निवड केली जाते. जिल्ह्यातील शिक्षकांच्या कार्याला प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्या उल्लेखनीय योगदानाचा गौरव व्हावा, या उद्देशाने हा पुरस्कार महत्त्वपूर्ण मानला जातो.

### जाफराबाद तालुका...

आणि समाजबांधवांनी एकजुटीचे प्रदर्शन करत मराठा आरक्षणाच्या मागणीला आपला ठाम पाठिंबा असल्याचे स्पष्ट केले. तालुक्यातील अनेक गावांमधून नागरिक स्वयंस्फूर्तीने जाफराबाद शहरात दाखल झाल्याने बंदच्या निमित्ताने मोठ्या संख्येने समाजबांधव एकत्र आल्याचे चित्र पाहायला मिळाले.

बंददरम्यान नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी अत्यावश्यक सेवा सुरळीत ठेवण्यात आल्या होत्या. रुग्णालये, मेडिकल, दूध वितरण तसेच वृत्तपत्र वितरण सेवा सुरू ठेवण्यात आली होती. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना आवश्यक सेवा मिळण्यात कोणतीही मोठी अडचण निर्माण झाली नाही.

बंदच्या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी जाफराबाद पोलीस प्रशासनाकडून शहरातील प्रमुख चौक, बाजारपेठ आणि संवेदनशील ठिकाणी कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पोलिसांकडून संपूर्ण परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात आले. बंद शांततेच्या आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडला. कोणताही अनुचित प्रकार न घडता बंद यशस्वी झाल्याने प्रशासनानेही सुटकेचा श्वास घेतला. बंद यशस्वी झाल्यानंतर सकल मराठा समाजाच्या वतीने मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी सुरू असलेला लढा पुढेही कायम ठेवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. मनोज जरांगे पाटील यांचा पुढील आदेश मिळेपर्यंत आरक्षणाच्या मागणीसाठी शांततामय मार्गाने संघर्ष सुरूच ठेवणार, अशी भूमिका यावेळी समाजबांधवांनी व्यक्त केली.जाफराबाद तालुका बंद यशस्वी करण्यासाठी सहकार्य करणाऱ्या शहरातील सर्व व्यापारी बांधव, वाहतूकदार, पत्रकार, पोलीस प्रशासन तसेच सर्व जाती-धर्मातील नागरिकांचे सकल मराठा समाजाच्या वतीने आभार मानण्यात आले. नागरिकांनी शांतता आणि सामाजिक सलोखा कायम ठेवत बंदला दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद हा मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी असलेल्या एकजुटीचे प्रतीक असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

### सुप्रिया कॉलेज...

सौ. सुरेखाताई संजय लहाने, सचिव श्री. संजयजी लहाने तसेच सहसचिव श्री. सुयश संजय लहाने यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुजाहिद नसिर पठाण यांच्या नेतृत्वाखाली तसेच सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि शैक्षणिक प्रगतीसाठी पोषक वातावरण मिळत असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. द्वितीय वर्ष बी. फार्मसीमध्ये यश संपादन करणाऱ्या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे सुप्रिया कॉलेज ऑफ फार्मसी, टेंभुर्णीच्या शैक्षणिक गुणवत्तेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

### 'ब फायनल...

सांगितले. संबंधित जागेबाबत गैरसमज निर्माण करणे, ताब्यात अडथळे निर्माण करणे तसेच उर्वरित भूखंडांची विक्री होऊ नये, या उद्देशाने तक्रार करण्यात आल्याचे तपास अहवालात नमूद असल्याचा दावा त्यांनी केला. दिवाणी व महसुली न्यायालयांमध्ये सुरू असलेल्या मालमत्ता वादाला फौजदारी प्रकरणाचे स्वरूप देण्याचा प्रयत्न झाल्याचाही तपास अहवालात उल्लेख असल्याचे डागा यांनी सांगितले. यापूर्वी दाखल असलेल्या गुन्ह्यांमध्ये स्वतःचा तसेच नातेवाइकांचा बचाव करण्यासाठी आणि शासकीय यंत्रणेची दिशाभूल करण्याच्या उद्देशाने ही तक्रार करण्यात आल्याचे तपासात नमूद असल्याचा दावाही त्यांनी केला.

युवा आदर्श
जालना
शनिवार दि. ०५ सप्टेंबर २०२६
E-mail- yuva.aadarsh@gmail.com


## रेल्वे प्रकल्पांना गती; मग संघर्ष समितीचा गजर कशासाठी?

# ६ सप्टेंबरची परिषद केवळ भाषणांचा कार्यक्रम ठरू नये

## 'मराठवाडा रेल्वे परिषद' की जालना केंद्रित परिषद?

**जालना । प्रतिनिधी**

जालना-खामगाव-जळगाव रेल्वेमार्गासह मराठवाड्यातील रखडलेल्या रेल्वे प्रकल्पांना गती मिळावी, ही जनतेची अनेक वर्षांपासूनची मागणी आहे. या मागणीसाठी लोकप्रतिनिधी, व्यापारी संघटना, सामाजिक संस्था, रेल्वेप्रेमी आणि विविध नागरिक संघटनांकडून सातत्याने पाठपुरावा करण्यात आला आहे. आता या प्रकल्पांच्या प्रशासकीय प्रक्रियेत हालचाली सुरू झाल्याची माहिती समोर येत असतानाच जालना रेल्वे संघर्ष समितीने पुन्हा आंदोलनाची भूमिका घेतली आहे.

६ सप्टेंबर रोजी 'मराठवाडा रेल्वे परिषद' आयोजित करून विविध रेल्वे मागण्यांसाठी आवाज उठविण्यात येणार आहे. रेल्वे प्रश्नासाठी आंदोलन करण्याचा समितीला निश्चितच अधिकार आहे. मात्र, जेव्हा प्रकल्पाच्या फाईली प्रशासकीय पातळीवर पुढे सरकत असल्याचे सांगितले जाते, तेव्हा पुन्हा संघर्षाचा गजर नेमका कशासाठी? हा प्रश्न आता चर्चेत आला आहे.

प्रकल्पाला प्रत्यक्ष गती देण्यासाठी आंदोलन आवश्यक आहे का, की वर्षानुवर्षे विविध व्यक्ती आणि संस्थांनी केलेल्या सामूहिक पाठपुराव्याचे श्रेय एका समितीच्या आंदोलनाच्या खात्यावर जमा करण्याचा प्रयत्न होत आहे? हा सवाल उपस्थित होणे स्वाभाविक आहे.

कारण रेल्वे हा केवळ घोषणा आणि आंदोलनाचा विषय नाही. सर्वेक्षण, तांत्रिक अहवाल, डीपीआर, आर्थिक व्यवहार्यता, प्रशासकीय मंजुरी, निधी, भूसंपादन आणि प्रत्यक्ष बांधकाम अशा अनेक टप्प्यांतून रेल्वे प्रकल्प मार्गी लागतो. त्यामुळे आता जनतेला केवळ घोषणा नकोत, तर प्रकल्पाची कागदोपत्री सद्यस्थिती आणि पुढील कृती आराखडा हवा आहे.

जालना-खामगाव रेल्वेमार्गाचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. या मार्गासाठी यापूर्वी सर्वेक्षण, डीपीआर आणि प्रशासकीय पातळीवर विविध प्रकारचा पाठपुरावा झाला आहे. २०२२ मध्येही प्रकल्पाच्या डीपीआरसंदर्भातील माहिती चर्चेत आली होती. आता २०२६ मध्ये प्रकल्पाच्या पुढील प्रक्रियेला गती मिळत असून भूसंपादनासह प्रशासकीय हालचाली सुरू असल्याची माहिती समोर येत आहे.

मग प्रश्न असा आहे की, प्रकल्प नेमका कुठे अडकला आहे? निधीचा प्रश्न असेल तर किती निधी आवश्यक आहे आणि किती उपलब्ध आहे? भूसंपादनाचा प्रश्न असेल तर कोणत्या गावांमध्ये आणि किती क्षेत्राचे भूसंपादन प्रलंबित आहे? प्रशासकीय मंजुरी बाकी असेल तर कोणत्या स्तरावर ती प्रलंबित आहे? तांत्रिक अडचण असेल तर ती नेमकी कोणती? रेल्वे मंत्रालय अथवा रेल्वे बोर्डाच्या कोणत्या निर्णयाची प्रतीक्षा आहे? या प्रश्नांची उत्तरे दस्तऐवजांसह जनतेसमोर ठेवणे आवश्यक आहे.

केवळ 'रेल्वे हवी', 'संघर्ष हवा', 'अन्याय झाला' अशा घोषणांमधून रेल्वे प्रकल्प प्रत्यक्ष रुळावर येत नाही. त्यासाठी फाईल कोणत्या टेबलावर आहे, कोणता निर्णय बाकी आहे आणि तो निर्णय घेण्यासाठी कोणत्या पातळीवर पाठपुरावा आवश्यक आहे, हे स्पष्ट झाले पाहिजे. जालना-खामगाव रेल्वेमार्गासाठी आजपर्यंत अनेकांनी प्रयत्न केले आहेत. खासदार, आमदार, मंत्री, माजी मंत्री, व्यापारी, उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध संघटनांनी आपल्या परीने केंद्र व राज्य शासनाकडे पाठपुरावा केला आहे. म्हणून रेल्वेचा प्रश्न एखाद्या एका समितीने निर्माण केलेला नाही आणि उद्या केवळ एका आंदोलनामुळेच तो सुटणार आहे, असे गृहीत धरणेही वास्तवाला धरून ठरणार नाही.

रेल्वे प्रकल्प हा एका दिवसाच्या आंदोलनाचा परिणाम नसतो. त्यामागे अनेक वर्षांची प्रशासकीय प्रक्रिया आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा असतो. त्यामुळे आजवर ज्यांनी या प्रश्नासाठी प्रयत्न केले, त्यांच्या भूमिकेचेही सार्वजनिकपणे मूल्यमापन झाले पाहिजे.

सामूहिक प्रयत्नांचा इतिहास बाजूला सारून संपूर्ण श्रेय एका आंदोलनाला देणे योग्य आहे का? हा प्रश्नही त्याचबरोबर विचारला जाणे गरजेचे आहे. ६ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात येणाऱ्या 'मराठवाडा रेल्वे परिषद' या नावावरूनही प्रश्न उपस्थित होत आहेत.

मराठवाडा हा केवळ जालना जिल्ह्यापुरता मर्यादित नाही. छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी, नांदेड, हिंगोली, लातूर आणि धाराशिव या सर्व जिल्ह्यांचे रेल्वेशी संबंधित स्वतंत्र प्रश्न आहेत.

जर परिषदेला 'मराठवाडा रेल्वे परिषद' असे व्यापक नाव दिले जात असेल, तर या सर्व जिल्ह्यांचा प्रत्यक्ष सहभाग किती आहे? प्रत्येक जिल्ह्याच्या रेल्वे प्रश्नांसाठी कोणती अधिकृत भूमिका मांडण्यात येणार आहे? त्या जिल्ह्यांतील लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटना, व्यापारी संघटना आणि रेल्वेप्रेमी यांचा सहभाग किती आहे? या प्रश्नांची उत्तरे मिळणे आवश्यक आहे.

'मराठवाडा' या व्यापक नावाचा वापर करून प्रत्यक्षात जालनाकेंद्रित आंदोलनाला व्यापक स्वरूप देण्याचा प्रयत्न होत आहे का, अशी शंका निर्माण होत असेल तर ती दूर करण्याची जबाबदारी आयोजकांचीच आहे. मराठवाड्याच्या नावाने परिषद होत असेल तर मराठवाड्याचे प्रतिनिधित्वही प्रत्यक्ष दिसले पाहिजे.

**जालना-खामगाव-जळगाव मार्गाचा कागदोपत्री हिशेब द्या**

जालना-खामगाव-जळगाव रेल्वेमार्गाच्या मागणीचा सातत्याने उल्लेख केला जात असताना या संपूर्ण प्रकल्पाची प्रशासकीय स्थिती स्पष्ट करण्याची वेळ आली आहे. सर्वेक्षण कुठपर्यंत झाले? डीपीआरची सद्यस्थिती काय? प्रकल्पाची अंदाजित किंमत किती आहे? निधी किती उपलब्ध आहे? केंद्र सरकारकडून कोणत्या टप्प्यावर मंजुरी मिळाली आहे? भूसंपादनासाठी किती जमीन आवश्यक आहे? किती जमीन संपादित झाली?किती जमीन अद्याप बाकी आहे? प्रत्यक्ष बांधकाम सुरू होण्याची शक्य वेळ कोणती? या प्रश्नांची कागदोपत्री उत्तरे जनतेसमोर ठेवली गेली तर आंदोलनाला निश्चितच अधिक विश्वासार्हता मिळेल. जनतेला घोषणा नव्हे, फाईलची स्थिती जाणून घ्यायची आहे. नांदेड विभागाची पुनर्रचना करून स्वतंत्र मराठवाडा रेल्वे विभाग किंवा स्वतंत्र रेल्वे प्रशासकीय व्यवस्था निर्माण करण्याची मागणीही पुढे केली जात आहे. मराठवाड्याच्या दृष्टीने ही महत्त्वाची मागणी असून तिच्यावर निश्चितच गांभीर्याने चर्चा होणे आवश्यक आहे. मात्र ही मागणी प्रत्यक्ष धोरणात रूपांतरित करण्यासाठी ठोस प्रशासकीय प्रस्ताव आवश्यक आहे. केंद्र सरकारकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे का? रेल्वे बोर्डाने त्यावर काय भूमिका घेतली आहे? प्रस्तावाची आर्थिक व्यवहार्यता तपासण्यात आली आहे का?

स्वतंत्र विभागासाठी अंदाजित खर्च किती आहे? मुख्यालय कोणत्या शहरात असावे, याचा प्रस्ताव आहे का? या विभागात कोणते रेल्वे मार्ग समाविष्ट करण्यात येणार आहेत? नवीन विभागासाठी आवश्यक मनुष्यबळ आणि प्रशासकीय पायाभूत सुविधा किती असतील? या प्रश्नांची उत्तरे उपलब्ध नसतील आणि केवळ व्यासपीठावर घोषणा होत असतील, तर मागणी प्रत्यक्ष निर्णयापर्यंत कशी पोहोचणार?स्वतंत्र रेल्वे विभाग हा घोषणांनी नव्हे, तर केंद्राच्या प्रशासकीय निर्णयाने निर्माण होतो. त्यामुळे त्यासाठी ठोस प्रस्ताव आणि सातत्यपूर्ण संस्थात्मक पाठपुरावा आवश्यक आहे.

नगर-बीड-परळी, वर्धा-नांदेड, लातूर-कुडूवाडी यांसह मराठवाड्यातील विविध रेल्वे प्रकल्पांचा प्रश्न अधूनमधून उपस्थित केला जातो. हे सर्व प्रकल्प महत्त्वाचे आहेत. मात्र प्रत्येक प्रकल्पाची अडचण आणि प्रशासकीय स्थिती वेगळी आहे.

कुठे निधीचा प्रश्न असू शकतो, कुठे भूसंपादनाचा, कुठे तांत्रिक मंजुरीचा तर कुठे प्रशासकीय प्रक्रियेचा. त्यामुळे सर्व प्रश्नांना 'मराठवाड्यावर अन्याय' या एकाच चौकटीत बसवून चालणार नाही.प्रत्येक प्रकल्पाचे स्वतंत्र 'पोस्टमार्टेम' झाले पाहिजे.

कुठे अडला? का अडला? किती निधी आवश्यक? किती निधी उपलब्ध? किती खर्च झाला? भूसंपादन किती बाकी? मंजुरी कोणाची प्रलंबित? पुढील निर्णय कोण घेणार? आणि प्रत्यक्ष कामाची कालमर्यादा काय? हा संपूर्ण हिशेब जनतेसमोर आला तरच रेल्वे आंदोलन अधिक परिणामकारक होईल.

६ सप्टेंबरची परिषद ही केवळ नेत्यांची भाषणे, घोषणा आणि छायाचित्रांचा कार्यक्रम ठरू नये, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

खासदार, आमदार, मंत्री, माजी मंत्री आणि विविध राजकीय व सामाजिक क्षेत्रातील नेते उपस्थित राहणार असतील तर त्यांच्या समोर ठोस आणि मोजता येतील अशा मागण्या मांडल्या पाहिजेत.

परिषदेतून पुढील बाबी स्पष्ट झाल्या पाहिजेत. प्रत्येक रेल्वे प्रकल्पाची सद्यस्थिती. प्रकल्पनिहाय निधीची आवश्यकता आणि उपलब्धता. भूसंपादनाची स्थिती. प्रलंबित प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी. केंद्र व राज्य शासनाकडे प्रलंबित प्रस्ताव. प्रत्येक कामाची अपेक्षित कालमर्यादा. संबंधित विभाग आणि जबाबदार यंत्रणा. पुढील पाठपुराव्याची स्पष्ट दिशा.

परिषद संपल्यानंतर ठराव होईल, घोषणा होतील, प्रसिद्धी मिळेल आणि काही दिवसांनी पुन्हा तोच प्रश्न चर्चेत येईल, असे चक्र आता थांबले पाहिजे.

परिषदेचा शेवट ठरावात नव्हे, तर निर्णयाच्या पाठपुराव्यात झाला पाहिजे.

आंदोलन करण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे. सार्वजनिक प्रश्नांसाठी संघर्ष करणे ही लोकशाहीतील महत्त्वाची प्रक्रिया आहे. मात्र आंदोलन जितके मोठे, तितकी त्याची उत्तरदायित्वाची अपेक्षाही मोठी असते.

त्यामुळे संघर्ष समितीने आतापर्यंतच्या आंदोलनाचा हिशेबही जनतेसमोर ठेवणे आवश्यक आहे. आजवर किती आंदोलने झाली? केंद्र किंवा राज्य शासनाकडे किती निवेदने दिली? कोणत्या अधिकाऱ्यांशी बैठका झाल्या? कोणती फाईल पुढे गेली? कोणती मंजुरी मिळाली? किती निधी मंजूर झाला? कोणता प्रकल्प आंदोलनामुळे प्रशासकीय पातळीवर पुढे सरकला? या प्रश्नांची उत्तरे दिली तर आंदोलनाची परिणामकारकता सिद्ध होईल.

जालना-खामगाव-जळगाव रेल्वेमार्ग हा जालना जिल्ह्याच्या औद्योगिक, व्यापारी आणि कृषी विकासासाठी महत्त्वाचा ठरू शकतो. रेल्वे जोडणीमुळे मालवाहतूक, उद्योग, रोजगार, बाजारपेठ आणि प्रवासी वाहतूक या सर्व क्षेत्रांना फायदा होण्याची शक्यता आहे.

त्यामुळे या प्रकल्पाचे श्रेय कोणाला मिळते, यापेक्षा तो प्रत्यक्षात किती वेगाने पूर्ण होतो, हा जनतेसाठी अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे.

ज्यांनी प्रयत्न केले त्यांचे योगदान मान्य झाले पाहिजे. ज्यांच्याकडे निर्णय घेण्याची सत्ता आहे, त्यांच्याकडून निर्णय घेतला पाहिजे. ज्यांच्याकडे कामाची जबाबदारी आहे, त्यांच्याकडून काम करून घेतले पाहिजे. आणि आंदोलन करणाऱ्यांनीही आपल्या आंदोलनाचा प्रत्यक्ष परिणाम जनतेसमोर मांडला पाहिजे. रेल्वेचा प्रश्न भावनिक असला तरी त्याचे उत्तर प्रशासकीय आणि तांत्रिक प्रक्रियेत आहे. त्यामुळे आंदोलनाला भावनिक आवाहनाची जोड असली तरी त्याचा केंद्रबिंदू दस्तऐवज, निधी, मंजुरी, भूसंपादन आणि कालमर्यादा असला पाहिजे.

मराठवाड्याच्या रेल्वे विकासासाठी व्यापक परिषद भरविली जात असेल तर तिच्यात मराठवाड्यातील प्रत्येक जिल्ह्याचा आवाज ऐकू यायला हवा. जालना-खामगाव-जळगाव मार्गासाठी आंदोलन होत असेल तर त्या प्रकल्पाची अचूक प्रशासकीय स्थिती जनतेसमोर आली पाहिजे. कारण आता जनतेला एकच प्रश्न पडला आहे रेल्वे प्रकल्पांची फाईल पुढे सरकत असताना संघर्ष समितीचा गजर नेमका कशासाठी? प्रकल्पाला गती देण्यासाठी असेल तर त्याचा परिणाम कागदोपत्री आणि प्रत्यक्ष कामात दिसला पाहिजे. वर्षानुवर्षांच्या सामूहिक पाठपुराव्याचे श्रेय घेण्यासाठी असेल, तर त्यावर प्रश्न उपस्थित होणारच. मराठवाड्याच्या नावाने परिषद होत असेल तर मराठवाड्याचे प्रतिनिधित्व दिसले पाहिजे. आणि रेल्वेसाठी संघर्ष होत असेल तर त्याचा अंतिम परिणाम बॅनरवर नव्हे, रेल्वेच्या रुळांवर दिसला पाहिजे. मराठवाड्याला घोषणांची रेल्वे नको; प्रत्यक्ष धावणारी रेल्वे हवी. जनतेला श्रेयवाद नको; प्रकल्पपूर्ती हवी.आता प्रश्न आंदोलन किती मोठे झाले याचा नाही. रेल्वे प्रकल्प किती पुढे गेला याचा आहे.

---

# गोकुळाष्टमी, कृष्णजन्म उत्सव आणि दहीहंडी : परंपरा, संस्कार आणि शिकण्यासारखे बरेच काही!

गोकुळाष्टमी हा भारतीय सांस्कृतिक परंपरेतील महत्त्वाचा उत्सव आहे. भगवान श्रीकृष्णाच्या जन्माच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो. महाराष्ट्रात कृष्णजन्माचा सोहळा, पाळणा, भजन-कीर्तन, गोपाळकाला आणि दहीहंडी अशा विविध स्वरूपांत हा उत्सव साजरा करण्याची परंपरा आहे. त्यामुळे या उत्सवाला धार्मिक श्रद्धेबरोबरच लोकपरंपरा आणि सामूहिक सहभागाचेही स्वरूप प्राप्त झाले आहे.

**कृष्णजन्म उत्सवाची परंपरा**

गोकुळाष्टमीच्या रात्री अनेक ठिकाणी कृष्णजन्माचा सोहळा केला जातो. मंदिरांमध्ये आणि घरांमध्ये बाळकृष्णाची सजावट केली जाते, पाळणा सजवला जातो आणि भजन-कीर्तन, आरती आदी कार्यक्रम होतात. मध्यरात्री कृष्णजन्माचे प्रतीकात्मक सादरीकरण केले जाते. महाराष्ट्रातील अनेक भागांत या उत्सवाशी दहीकाला आणि दहीहंडीच्या परंपराही जोडलेल्या आहेत.

या परंपरांमधून एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे धार्मिक श्रद्धा, लोकगीते, कथा, कलाप्रकार आणि उत्सवपद्धती पोहोचतात. त्यामुळे उत्सव हा सांस्कृतिक वारसा जपण्याचे एक माध्यमही ठरतो.

**दहीहंडी : कृष्णलीलेचे लोकपरंपरेतील रूप**

महाराष्ट्रात दहीहंडी हा जन्माष्टमीशी संबंधित लोकप्रिय उत्सव आहे. उंच ठिकाणी हंडी बांधून गोविंदा पथके मानवी मनोरा तयार करतात आणि ती फोडण्याचा प्रयत्न करतात. या प्रथेचा संबंध बालकृष्णाच्या लोणी-दहीशी संबंधित बाललीलांशी जोडला जातो. मात्र, आजची मानवी मनोरा रचण्याची स्पर्धात्मक पद्धत ही कृष्णाच्या काळातील प्रत्यक्ष ऐतिहासिक घटना होती, असे निश्चितपणे म्हणता येत नाही; ती कृष्णलीलेच्या स्मरणातून विकसित झालेली लोकपरंपरा म्हणून पाहणे अधिक योग्य आहे.

**सामूहिक प्रयत्नांचा धडा**

दहीहंडीचे सर्वांत लक्षवेधी वैशिष्ट्य म्हणजे सामूहिक प्रयत्न. हंडी फोडण्यासाठी अनेक जण एकत्र येतात. प्रत्येकाची भूमिका वेगळी असते आणि एका व्यक्तीचे यश इतरांच्या सहकार्यावर अवलंबून असते. यातून एक महत्त्वाचा जीवनधडा घेता येतोएकट्या व्यक्तीच्या क्षमतेपेक्षा संघटित प्रयत्नांची ताकद अनेकदा अधिक प्रभावी ठरते.

मानवी मनोरा उभा करताना तळातील व्यक्तींना स्थैर्य द्यावे लागते, मधल्या थरातील सदस्यांना समतोल राखावा लागतो आणि वरच्या सदस्याला लक्ष्य गाठावे लागते. प्रत्येकाची जबाबदारी महत्त्वाची असते. हीच गोष्ट कुटुंब, शाळा, संस्था किंवा समाजाच्या कामातही लागू पडते.

**संघभावना आणि परस्पर विश्वास**

दहीहंडी हा केवळ शारीरिक कौशल्याचा कार्यक्रम नाही. त्यामध्ये संघभावना, परस्पर विश्वास, समन्वय आणि शिस्त यांना महत्त्व असते.

एकाच उद्दिष्टासाठी अनेक व्यक्तींनी आपापली भूमिका योग्य प्रकारे पार पाडणे आवश्यक असते. कोण पुढे आहे आणि कोण मागे आहे यापेक्षा



संपूर्ण समूहाचे उद्दिष्ट साध्य होणे महत्त्वाचे असते.

विद्यार्थ्यांना आणि तरुणांना या माध्यमातून सहकार्य, जबाबदारी आणि समूहामध्ये काम करण्याचे महत्त्व समजावून सांगता येते.

**नेतृत्व आणि नियोजन**

दहीहंडीच्या आयोजनात आणि गोविंदा पथकाच्या प्रयत्नांत नियोजनाची आवश्यकता असते. कोण कुठे उभे राहणार, कोणती भूमिका कोण पार पाडणार आणि समूहाने कोणत्या पद्धतीने प्रयत्न करायचा, यासाठी समन्वय आवश्यक असतो.

त्यामुळे या उत्सवाकडे नेतृत्व आणि नियोजन शिकण्याच्या एका लोकपरंपरेतील उदाहरणाप्रमाणेही पाहता येते.

नेतृत्व म्हणजे केवळ स्वतः पुढे जाणे नव्हे; तर इतरांच्या क्षमतांचा योग्य उपयोग करून समूहाला उद्दिष्टापर्यंत घेऊन जाणे होय.

**अपयशातून शिकण्याची संधी**

हंडी फोडण्याचा प्रयत्न प्रत्येक वेळी यशस्वी होईलच असे नाही. प्रयत्न अपयशी ठरल्यास पथक पुन्हा प्रयत्न करते. या प्रक्रियेतून अपयशानंतर पुन्हा उभे राहणे आणि चुका सुधारून प्रयत्न करणे हा महत्त्वाचा जीवनधडा घेता येतो.

विद्यार्थ्यांच्या जीवनातही हेच लागू होते. परीक्षेत, स्पर्धेत किंवा एखाद्या प्रयत्नात अपेक्षित यश मिळाले नाही, तर त्यातून शिकून पुढील प्रयत्न अधिक चांगला करणे महत्त्वाचे आहे.

**आनंदासोबत जबाबदारी**

उत्सवाचा केंद्रबिंदू आनंद असला तरी त्यासोबत जबाबदारीही आवश्यक आहे. मानवी मनोरा, मोठी गर्दी आणि सार्वजनिक कार्यक्रम यामुळे सुरक्षिततेची काळजी घेणे महत्त्वाचे ठरते.

परंपरा जपताना सहभागींची सुरक्षितता, शिस्त, नियमांचे पालन आणि इतरांच्या सुरक्षिततेचा विचार करणे हा आधुनिक काळातील महत्त्वाचा संस्कार आहे.

**परंपरेतून मूल्यशिक्षण**

परंपरेचा अर्थ केवळ धार्मिक विधीपुरता मर्यादित ठेवण्याची गरज नाही. त्यामध्ये असलेल्या सामाजिक आणि मानवी मूल्यांकडेही पाहता येते. गोकुळाष्टमी सांस्कृतिक परंपरेशी जोडते. कृष्णजन्म उत्सव सामूहिक आनंदाची अनुभूती देतो. गोपाळकाला आणि दहीहंडीच्या लोकपरंपरांमधून सहभाग आणि उत्साह व्यक्त होतो. दहीहंडीतील सामूहिक प्रयत्नांतून संघभावना, समन्वय, जबाबदारी, नियोजन आणि चिकाटी यांसारखी मूल्ये समजावून घेता येतात.

गोकुळाष्टमी, कृष्णजन्म उत्सव आणि दहीहंडी या आपल्या सांस्कृतिक जीवनातील वेगवेगळ्या परंपरांना जोडणारा उत्सव आहे. त्याचे धार्मिक महत्त्व श्रद्धेचा विषय आहे; तर त्यातून निर्माण होणारी लोकपरंपरा आणि सामाजिक सहभाग हा सांस्कृतिक जीवनाचा भाग आहे.

या उत्सवाकडे केवळ मनोरंजन किंवा स्पर्धा म्हणून न पाहता त्यातून सकारात्मक मूल्ये पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवता येतात. एकमेकांना आधार देणे, सामूहिक प्रयत्न करणे, जबाबदारी स्वीकारणे, अपयशानंतर पुन्हा प्रयत्न करणे आणि सुरक्षिततेची काळजी घेणेहे या उत्सवातून शिकण्यासारखे महत्त्वाचे धडे आहेत.

शेवटी, दहीहंडीचा खरा अर्थ केवळ हंडी फोडण्यात नसून एकमेकांच्या आधाराने उंच उभे राहण्यात शोधता येतो. हीच या लोकपरंपरेतून घेता येणारी एक सुंदर जीवनशिक्षणाची बाजू आहे.



**डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली, रत्नागिरी.**

---

# गुरुकुल इंग्लिश स्कूलमध्ये स्वयंशासन दिन उत्साहात साजरा



**दत्ता देशमुख**

गुरुकुल इंग्लिश स्कूलमध्ये स्वयंशासन दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, आत्मविश्वास, निर्णयक्षमता तसेच जबाबदारीची भावना विकसित व्हावी, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. स्वयंशासन दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, शिक्षक तसेच विविध शालेय पदांची जबाबदारी स्वीकारून शाळेचे दैनंदिन कामकाज यशस्वीपणे सांभाळले.

विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका पार पाडत विविध विषयांचे अध्यापन केले. तसेच प्रार्थना, शालेय शिस्त, वर्गव्यवस्थापन आणि विविध शैक्षणिक उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना शालेय प्रशासन, शिक्षकांच्या जबाबदाऱ्या आणि शाळेच्या दैनंदिन कामकाजाचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला.

विद्यार्थ्यांनी जबाबदारीने पार पाडलेल्या भूमिकांचे उपस्थित शिक्षकांनी कौतुक केले.

यावेळी मुख्याध्यापक म्हणून वैष्णवी साबळे, तर उपमुख्याध्यापक म्हणून सपना बरडे यांनी भूमिका पार पाडली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी युवा उद्योजक दिनेश भाऊ दळवी उपस्थित होते.सूत्रसंचालन नितिन राठोड यांनी तर आभार प्रदर्शन पूजा पिसे यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक विलास चिकटे, शोएब मदनी, कृष्णा गावंडे,राहुल शेरकर प्रभा भाग्यवंत, संविता गाडेकर, आशिष बनकर, प्रदीप कुदळे, नेहा फुके, साद शेख, निखिल साबळे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नेतृत्व, शिस्त, जबाबदारी व निर्णयक्षमता विकसित करणाऱ्या अशा उपक्रमांचे आयोजन भविष्यातही सातत्याने करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# पर्यावरणपूरक गणेशमुर्तीचा जागतिक विक्रम; ५,३४८जणांनी साकारल्या शाडूमातीच्या गणेशमूर्ती







**जालना - प्रतिनिधी**

एकाच वेळी सर्वाधिक व्यक्तींनी शाडूमातीपासून गणेशमूर्ती साकारण्याचा नवा विक्रम जालना जिल्ह्याने प्रस्थापित केला. ५ हजार ३४८ जणांनी एकाच ठिकाणी, एकाच वेळी शाडूमातीच्या गणेशमूर्ती साकारत यापूर्वीचा विक्रम मोडीत काढला. या ऐतिहासिक कामगिरीची गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्स आणि लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्स मध्ये नोंद व मान्यता मिळाल्याने जालन्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. यापूर्वी २८ ऑगस्ट २०२२ रोजी बंगळुरू येथे ३ हजार ३०८ सहभागींच्या उपस्थितीत एकाच वेळी गणेशमूर्ती साकारण्याचा विक्रम नोंदविण्यात आला होता. आज येथील जेईएस महाविद्यालयात आयोजित उपक्रमात ५ हजार ३४८ जणांनी सहभाग घेत हा विक्रम तब्बल २ हजार ०४० सहभागींच्या फरकाने मोडला.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद आणि शिक्षण विभाग, अद्विक क्लब यांच्या समन्वयातून पर्यावरणपूरक उपक्रम पार पडला. हजारो विद्यार्थी आणि नागरिकांनी आज एकाच ठिकाणी एकत्र येऊन शाडूमातीपासून गणेशमूर्ती साकारल्या. या उपक्रमामागील उद्देश केवळ विश्वविक्रम प्रस्थापित करणे हा नव्हता, तर गणेशोत्सवाच्या माध्यमातून पर्यावरणसंरक्षणाचा संदेश घराघरांत पोहोचविणे हा होता. पर्यावरणाला हानी पोहोचविणाऱ्या साहित्याऐवजी नैसर्गिक व पर्यावरणपूरक शाडूमातीच्या गणेशमूर्तींचा स्वीकार करण्याचे आवाहन या उपक्रमातून करण्यात आले.

या प्रसंगी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी उपस्थितांना पर्यावरण संरक्षण, स्वच्छता, जलसंवर्धन आणि जबाबदार नागरिकत्वाचा संदेश दिला. हजारो विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग हा केवळ विश्वविक्रमाचा आकडा नसून, पर्यावरणपूरक भविष्य घडविण्यासाठी नव्या पिढीने घेतलेला सामूहिक संकल्प असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

उपक्रमाच्या यशस्वितेसाठी जिल्हा परिषद व शिक्षण विभागातील अधिकारी, विविध शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षक, अद्विक क्लब, स्वयंसेवक, समन्वयक तसेच विविध शासकीय विभागांचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

# जाफराबाद तालुका बंदच्या हाकेला भरभरून प्रतिसाद; शहरात दिवसभर शुकशुकाट

## व्यापारी महासंघासह नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग; छत्रपती शिवाजी महाराज चौकात शेकडो समाजबांधवांची उपस्थिती

**दत्ता देशमुख**

जाफराबाद - मराठा समाजाला आरक्षण मिळावे, या मागणीसाठी अंतरवाली सराटी येथे मराठा आरक्षण संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या सुरू असलेल्या आमरण उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी सकल मराठा समाजाच्या वतीने पुकारण्यात आलेल्या जाफराबाद तालुका बंदला गुरुवारी अभूतपूर्व आणि ऐतिहासिक प्रतिसाद मिळाला. जाफराबाद शहरासह तालुक्यातील विविध गावांमधून नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने बंदमध्ये सहभाग नोंदवत मराठा आरक्षणाच्या मागणीला पाठिंबा दर्शविला.



बंदच्या पार्श्वभूमीवर सकाळपासूनच शहरातील वातावरणात मोठा बदल जाणवत होता. सकाळी ७ वाजल्यापासून शहरातील प्रमुख बाजारपेठांमधील बहुतांश दुकाने बंद होती. नेहमी नागरिकांची आणि वाहनांची वर्दळ असणाऱ्या मुख्य बाजारपेठेसह बसस्थानक परिसर, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक आणि महाराणा प्रताप चौक परिसरात दिवसभर मोठ्या प्रमाणात शुकशुकाट दिसून आला. बाजारपेठेतील प्रमुख व्यावसायिक प्रतिष्ठाने बंद असल्याने बंदचा परिणाम संपूर्ण शहरात स्पष्टपणे जाणवत होता.

जाफराबाद शहरातील व्यापारी महासंघानेही बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद देत स्वतःहून आपली दुकाने बंद ठेवली. तर मुस्लिम समाज बांधवांसह विविध व्यापारी आणि व्यावसायिकांनी बंदमध्ये सहभागी होत मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीला आपला पाठिंबा दर्शविला. व्यापाऱ्यांच्या या सहभागामुळे बंदला आणखी व्यापक स्वरूप प्राप्त झाले.

सकाळी ठीक ९ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकात तालुक्यातील विविध गावांमधून शेकडो तरुण, ज्येष्ठ नागरिक आणि समाजबांधव मोठ्या संख्येने एकत्र आले. तालुक्यातील तरुणांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. यावेळी चौकात झालेल्या सभेत विविध वक्त्यांनी मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीवर आपली भूमिका मांडली. ''आमची मागणी आरक्षणाची आहे, भांडणाची नाही. मराठा समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न सरकारने गांभीर्याने घेऊन मनोज जरांगे पाटील यांनी सरकारकडे केलेल्या मागण्या तातडीने पूर्ण कराव्यात,'' अशी मागणी यावेळी करण्यात आली.

सभेदरम्यान ''एक मराठा, लाख मराठा'', ''जय शिवराय'' अशा घोषणांनी छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसर दणाणून गेला. उपस्थित तरुण *(पान २ वर)*

# सुप्रिया कॉलेज ऑफ फार्मसीच्या द्वितीय वर्ष बी. फार्मसी परीक्षेत विद्यार्थ्यांचे घवघवीत यश



**दत्ता देशमुख**

टेंभुर्णी - जिजामाता ग्रामीण विकास व शिक्षण संस्था, जाफ्राबाद संचलित सुप्रिया कॉलेज ऑफ फार्मसी, टेंभुर्णी येथील द्वितीय वर्ष बी. फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले. महाविद्यालयाचा निकाल समाधानकारक लागला असून विद्यार्थ्यांनी आपल्या शैक्षणिक गुणवत्तेची उत्कृष्ट कामगिरीद्वारे छाप पाडली आहे. या परीक्षेत शिवानी संतोष जाधव हिने ८.०३ मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. रोशनी खुशालराव देशमुख हिने ८.०० मिळवत द्वितीय क्रमांक, तर वैशाली बजिराव गावंडे हिने ७.९१ मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला.

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा डॉ. *(पान २ वर)*

# 'ब फायनल'ने आरोपांवर पडदा; संध्या डागा यांना पोलिस तपासातून दिलासा!

## पोलिस तपासात आरोप निराधार ठरल्याचा डागा यांचा दावा

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील सर्व्हे क्रमांक ५५४ मधील जमिनीच्या वादातून दाखल झालेल्या फसवणूक, बनावट दस्तऐवज आणि कट रचल्यासारख्या गंभीर आरोपांच्या प्रकरणाला आता नवे वळण मिळाले आहे. कदीम जालना पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्हा क्रमांक १७०/२०२६ मध्ये पोलिसांनी तपास पूर्ण करून सक्षम न्यायालयासमोर 'ब फायनल' अहवाल दाखल केला असल्याची माहिती सौ. संध्या राजेंद्र डागा यांनी दिली.



पोलिस तपासात सदर गुन्हा घडला नसल्याचे वर्गीकरण करण्यात आल्याचा दावाही त्यांनी केला.

या पार्श्वभूमीवर सौ. संध्या राजेंद्र डागा यांनी शुक्रवारी, ४ सप्टेंबर रोजी दुपारी जालना शहरातील हॉटेल सिद्धार्थ द फर्न येथे पत्रकार परिषद घेऊन संपूर्ण प्रकरणाची माहिती प्रसारमाध्यमांसमोर मांडली. या पत्रकार परिषदेत त्यांनी तक्रारीतील आरोप, पोलिस तपासादरम्यान सादर करण्यात आलेली कागदपत्रे, न्यायालयीन कार्यवाही आणि 'ब फायनल' अहवालाबाबत आपली भूमिका स्पष्ट केली.

सर्व्हे क्रमांक ५५४ मधील मालमत्तेबाबतचा वाद नवीन नसून, यासंदर्भात विविध दिवाणी आणि महसुली कार्यवाही सुरू असल्याचे डागा यांनी *(पान २ वर)*

# परतूरला शास्त्री विद्यालयात वाचन पेटी उपक्रमास प्रारंभ; लॉयन्स क्लबचा उपक्रम

**परतूर - प्रतिनिधी**

परतूर येथील छत्रपती शिवाजीनगरमधील लालबहादूर शास्त्री विद्यालयात शुक्रवारी दि.०४/रोजी लॉयन्स क्लबच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या वाचन पेटी उपक्रमाचा शुभारंभ मुख्याध्यापक यांच्या हस्ते करण्यात आला.यावेळी लॉ. गुणवंत पिंपळे, प्रमोद टेकाळे, नरपत जांगीड यांचीही उपस्थिती होती.



विद्यार्थ्यांना वाचनाची आवड लागावी, त्यांच्या ज्ञानात अधिक भर पडावी या प्रमुख उद्देशाने येथील लॉयन्स क्लबच्या वतीने वाचन पेटी हा महत्वाकांक्षी उपक्रम राबविण्यात येत आहे.या उपक्रमांतर्गत शाळांमध्ये एक वाचन पेटी ठेवण्यात येणार आहे. या पेटीत विविध लेखकांची पुस्तके ठेवण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांनी ही पुस्तके घरी घेऊन जावीत व वाचन करावे असे अपेक्षित आहे. हा उपक्रम महिनाभर राबविण्यात येणार आहे.

**विद्यार्थ्यांना बालपणापासूनच वाचनाची आवड निर्माण व्हावी, त्यांचे वाचन कौशल्य विकसित व्हावे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून लॉयन्स क्लबच्या माध्यमातून वाचन पेटी हा उपक्रम राबविला जात आहे. त्याचा विद्यार्थ्यांना निश्चितच फायदा होणार आहे.**

**लॉ. मनोहर खालापुरे**

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.